सन २०२६-२७ करिता मुख्यलेखाशीर्ष २०५२-सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०), सचिवालय (००) (११) ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी सेतू महाराष्ट्र संस्थेला सहायक अनुदान (२०५२ ०५८२) (कार्यक्रम) खालील ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर) या तपशीलवार शीर्षाखालील मंजूर अनुदानातून निधी वितरण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग
शासन निर्णय क्र.मागणी-२०२६/प्र.क्र.११०/TECH-१ (E- 1806074)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दि. २१ ऑगस्ट, २०२६

संदर्भ : सामान्य प्रशासन (मातं) विभाग, शासन निर्णय क्रमांक. HPC-२०२६/प्र.क्र.६७/मातं, दि.२५/०३/२०२६.

प्रस्तावना:

भारतीय समृध्दी फायनान्स कंपनी विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने आदेशित केल्यानुसार न्यायालयात जमा करावयाची रक्कम अदा करण्यासाठी झालेल्या खर्चास उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर बाबींवरील खर्च भागविण्याकरिता निधी वितरित करण्याबाबत वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने सन २०२६-२७ करीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **रु.११,७०,४७,१३८/- (रुपये अकरा कोटी सत्तर लाख सत्तेचाळीस हजार एकशे अडतीस फक्त)** इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

भारतीय समृध्दी फायनान्स कंपनी विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने आदेशित केल्यानुसार न्यायालयात जमा करावयाची रक्कम अदा करण्याकरिता झालेला खर्च भागविण्यास सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीतून **रु.११,७०,४७,१३८/- (रुपये अकरा कोटी सत्तर लाख सत्तेचाळीस हजार एकशे अडतीस फक्त)** इतका निधी खालील अटींच्या अधीन राहून वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

i. प्रस्तावित खर्चाची पडताळणी करण्याची तसेच सदर खर्च उचित असल्याची खातरजमा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून करण्यात येईल.

ii. सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वितरीत करण्यात येणार आहे, त्याकरिता खर्च करण्याची तसेच निधी वितरीत करतांना विहित कार्यपध्दतीचे अनुपालन करण्याची व सदर खर्चाच्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्रे सादर करण्याची दक्षता इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाकडून घेण्यात येईल.

iii. मागणी केलेल्या निधीची रक्कम उचित असल्याची खातरजमा इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने करावी.

२. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने उक्त नमुद बाबींसाठी होणारा खर्च हा नेमून दिलेले "लेखाशिर्ष मागणी क्रमांक ए-४, "मुख्यलेखाशीर्ष २०५२ सचिवालय सर्वसाधारण सेवा (०९०)-सचिवालय (००) (११) ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी सेतू महाराष्ट्र संस्थेला सहायक अनुदाने (२०५२ ०५८२) (कार्यक्रम) खालील ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर)" या उद्दिष्टाखाली खर्ची टाकण्यात यावा. व तो वित्तीय वर्ष सन २०२६-२७ साठी मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्याच्या अनुषंगाने अधिदान व लेखा कार्यालयातून आहरीत करण्यासाठी उपसचिव, माहिती तंत्रज्ञान यांना नियंत्रक अधिकारी तसेच लेखाधिकारी, माहिती तंत्रज्ञान संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालयाने सदर खर्च करताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका (भाग-१) १९७७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार व वित्त विभागाच्या **अनौ.सं.क्र.४४१/व्यय-४, दि.२२/०७/२०२६** अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०८२११८२१३५१३११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI,
2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.08.21 18:22:33 +05'30'

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

२) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय यांचे स्वीय सहायक, मुंबई.

३) उप सचिव (अर्थसंकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

४) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई

७) वित्त विभाग, कार्यासन अर्थसंकल्प, व्यय-४, मंत्रालय, मुंबई

८) रोखशाखा (३ प्रती), इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई

९) निवडनस्ती